



# प्रीतिसंगम


www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर





शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

यांच्या जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन

- संपादक



| वर्ष ३० वे | अंक ३९ | पाने ४ | किंमत २ रूपये | मंगळवार ९ जून २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# ममतांना पुन्हा धक्का; २० खासदार फुटले

## ५८ आमदार फुटल्यानंतर खासदारांचाही भाजपला पाठिंबा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-**

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्ष तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद आणि नाराजी वाढल्याची माहिती आहे. पक्षाच्या आमदारांमध्ये आधीच फूट पडल्याच्या चर्चांदरम्यान आता ममता बॅनर्जी यांच्या अडचणीत वाढ झाली असून ममता बॅनर्जी यांचे अत्यंत विश्वासू सहकारी आणि कोलकात्याचे माजी महापौर फिरहाद हकीम यांनी बंडखोर खासदारांचे नेते ऋतब्रत बॅनर्जी यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली. मात्र, फिरहाद हकीम यांनी या भेटीला केवळ शिष्टाचार भेट असल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, काही दिवसांपूर्वीच त्यांनी कोलकात्याच्या महापौरपदाचा राजीनामा दिला असून टीएमसीमधील वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठ्या बदलांची नांदी म्हणून पाहिले जात आहे. आगामी काळात पक्षातील अंतर्गत संघर्ष आणखी तीव्र होतो का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना विरोधी पक्षनेते ऋतब्रत बॅनर्जी यांनी म्हटले की, हा केवळ सुखेंदु शेखर रॉय यांचाच मुद्दा नाही. मी त्यांच्याशी वैयक्तिकरित्या चर्चा केलेली नाही. मात्र, त्यांनी राज्यसभेच्या कामकाजाबाबत मांडलेली भूमिका योग्य आहे. संसद ही क्विझ शोचे व्यासपीठ नाही. त्यांच्या भावना आणि अनुभवाशी मी मोठ्या प्रमाणात सहमत आहे. ते पुढे म्हणाले की, माझ्यासारख्या ज्येष्ठ आणि अनुभवी खासदाराला मागील बाकांवर बसविण्यात आले, ही निराशाजनक बाब आहे. आज सुखेंदु यांनी आवाज उठवला आहे, उद्या इतर नेतेही अशीच भूमिका घेऊ शकतात.

लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे एकूण २८ खासदार आहेत. पक्षांतर बंदी कायद्यानुसार, पक्षात फूट पाडण्यासाठी किमान दोन तृतीयांश म्हणजेच १९ खासदारांची आवश्यकता असते. मात्र, बंडोखोर गटाने आपल्याकडे २० खासदार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा गट सुरक्षित मानला जात आहे. हे सर्व खासदार लोकसभेत अभिषेक बॅनर्जी यांच्याऐवजी काकोली घोष यांना आपले नेते निवडण्यास उत्सुक आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, टीएमसीच्या अडचणीत भर पडली असून तब्बल १४ खासदारांनी आज शुभेंदु अधिकारी यांची भेट घेतली. दुसरीकडे, तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार सुखेंदु शेखर रॉय यांनी आजच राज्यसभा सदस्यत्व आणि पक्ष अशा दोन्ही पदांचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर पक्षाच्या ५ बंडखोर खासदारांनी त्यांची दिल्लीत भेट घेतली, ज्यामुळे तृणमूलमधील असंतोष चव्हाट्यावर आला.




# नीट परीक्षा, एसआयआरसह पाच मुद्द्यावर इंडिया आघाडी आक्रमक

**नवी दिल्ली/प्रतिनिधी:-**

विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची सोमवारी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीत २३ विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले होते. बैठकीत देशातील आर्थिक परिस्थिती, नीट पेपरफुटी, सीबीएसई गोंधळ प्रकरण, मतदार याद्यांचे एसआयआर यांसह विविध राजकीय मुद्द्यांवर चर्चा झाली.

इंडिया आघाडीच्या बैठकीला काँग्रेसचे मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल आणि जयराम रमेश; तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, अभिषेक बॅनर्जी, कल्याण बॅनर्जी आणि डेरेक ओ'ब्रायन; राजदचे तेजस्वी यादव आणि संजय यादव; राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे; समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव; माकपचे जॉन ब्रिटास, ओमर अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती, कपिल सिब्बल यांनी उपस्थिती लावली होती. तर शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन ऑनलाइन उपस्थित होते.

बैठकीनंतर आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले की, बैठकीत पाच प्रमुख मुद्द्यांवर एकमताने निर्णय घेण्यात आले असून, त्यावर त्वरित कार्यवाही केली जाईल. खर्गे म्हणाले की, मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरावृत्ती (एसआयआर) आणि मतचोरी यांसारख्या मुद्द्यांवर भारताच्या सरन्यायाधीशांना संयुक्तपणे पत्र लिहिण्याचा निर्णय 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी घेतला आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत पक्षांनी उपस्थित केलेल्या चिंतांवर सरन्यायाधीशांनी हस्तक्षेप करावा, अशी विनंती करणारे हे पत्र लवकरात लवकर त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यावर नेत्यांचे एकमत झाले.

नीट आणि सीबीएसई परीक्षांना बसलेल्या लाखो विद्यार्थ्यांचा विश्वासघात केल्याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना जबाबदार धरून त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी करण्याचा निर्णयही आघाडीने एकमताने घेतला आहे. परीक्षांशी संबंधित मुद्द्यांच्या चुकीच्या हाताळणीचा विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या हितावर विपरीत परिणाम झाला असल्याचे विरोधी पक्षांच्या नेत्यांनी नमूद केले.

# होर्मुझमध्ये जळणाऱ्या जहाजातून २४ भारतीयांना वाचवले

**तेल अवीव/वृत्तसंस्था:-**

हॉर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ एका ऑईल टँकरला आग लागल्यानंतर भारतीय नौदलाने त्यावरील २४ भारतीय खलाशांची सुटका केली आहे. प्राथमिक वृत्तानुसार या जहाजावर हल्ला झाल्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी अद्याप अधिकृतपणे याची पुष्टी झालेली नाही.



दरम्यान, इराणने इस्त्रायलविरुद्धची आपली लष्करी कारवाई तात्पुरती थांबवल्याचे जाहीर केले आहे. मात्र, इस्त्रायलने लेबनॉन किंवा इतर ठिकाणांवर पुन्हा हल्ला केल्यास, त्याला पूर्वीपेक्षा अधिक कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही इराणने दिला आहे.

दुसरीकडे, अमेरिका युद्धविराम आणि शांतता करारासाठी सक्रियपणे प्रयत्न करत आहे. इस्त्रायल आणि इराण या दोन्ही देशांना हा संघर्ष संपवायचा आहे आणि अंतिम कराराबाबतची चर्चा प्रगतीपथावर आहे, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केला आहे. तसेच, जोपर्यंत करार होत नाही तोपर्यंत इराणवर लादलेले निर्बंध कायम राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या परिस्थितीचा विचार करता, भारत सरकारने इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना लवकरात लवकर तो देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, या भागातील सुरक्षेच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे आणि गरज पडल्यास भारतीयांना मदत करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील.

# अभियंत्याच्या खूनप्रकरणी दोन सुपारी किलर जेरबंद

## प्रेमसंबंधातून पत्नी, प्रियकर व साथीदाराचा कट; अपघाताचा बनाव करून दोनदा कारखाली चिरडले, दोघांना पोलीस कोठडी

**कराड/प्रतिनिधी:-**

अपघाताचा बनाव करून अभियंता लक्ष्मण मंडले यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी कराड शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आणखी दोन संशयितांना अटक केली आहे. प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याच्या कारणातून हा कट रचण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून, या प्रकरणातील प्रियकरासह त्याच्या साथीदाराला पोलिसांनी जेरबंद केले आहे. न्यायालयाने दोघांनाही १२ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

प्रथमेश प्रकाश थोरात (वय २५, रा. कार्वे, ता. कराड) आणि आकाश अशोक होनसुरे (वय २३, रा. कल्पतरू कॉलनी, थोरात हॉस्पिटलजवळ, कराड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. गुन्ह्यात यापूर्वीच मृत लक्ष्मण मंडले यांची पत्नी सारिका मंडले आणि तिचा भाऊ संग्राम चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासादरम्यान उघड झालेल्या धागेदोऱ्यांच्या आधारे प्रथमेश थोरात आणि आकाश होनसुरे यांना ताब्यात घेण्यात आले. हत्येसाठी वापरण्यात आलेली अल्टो कारही पोलिसांनी जप्त केली असून, या वाहनाच्या मदतीनेच लक्ष्मण मंडले यांच्या अंगावर गाडी घालण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.




तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आकाश होनसुरे याने पैशाच्या आमिषाला बळी पडून हा प्रकार केल्याची कबुली दिली आहे. प्रथमेश थोरात याच्या सांगण्यावरून त्याने वाहन चालवत लक्ष्मण मंडले यांना लक्ष्य केल्याचे उघड झाले आहे. मूळचा कर्नाटकचा असलेला आकाश हा बीसीए पदवीधर असून, या गुन्ह्यात त्याची भूमिका नेमकी काय होती याचा सखोल तपास सुरू आहे.

दरम्यान, प्रथमेश थोरात याची कापड व्यवसायाच्या निमित्ताने सारिका मंडले हिच्याशी ओळख झाली होती. पुढे या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. गेल्या तीन वर्षांपासून दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. लक्ष्मण मंडले हे या संबंधांमध्ये अडसर ठरत असल्याची भावना निर्माण झाल्याने त्यांना कायमचे दूर करण्याचा कट रचण्यात आल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. पान ३ वर

# राधिका रोडवरील अतिक्रमणांवर पालिकेचा हातोडा

## १९ टपऱ्या हटवल्या; ७ टपऱ्या जप्त, वाहतुकीला दिलासा

**सातारा/प्रतिनिधी:-**

सातारा नगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाने सोमवारी राधिका रोड परिसरात मोठी कारवाई करत अनधिकृत टपऱ्यांवर हातोडा चालवला. राधिका चौक ते महाराणा प्रताप चौक या मार्गावरील एकूण १९ टपऱ्या हटविण्यात आल्या असून त्यापैकी ७ टपऱ्या जप्त करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

शहरातील वाढत्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होत असल्याने पालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र केली आहे. समर्थ मंदिर परिसरातील



कारवाईनंतर सोमवारी राधिका रोड परिसरात ही मोहीम राबविण्यात आली.

अतिक्रमण निरीक्षक प्रशांत निकम यांच्या नेतृत्वाखाली दहा कर्मचाऱ्यांचे पथक, दोन जेसीबी आणि आवश्यक यंत्रणेसह सकाळी कारवाईसाठी दाखल झाले. पालिकेच्या कारवाईची माहिती मिळताच काही व्यावसायिकांनी स्वतःहून आपल्या टपऱ्या हटवण्यास सुरुवात केली. राधिका चौक, १२ टक्के कॉर्नर तसेच महाराणा प्रताप चौक परिसरातील रस्त्यालगत उभारलेल्या अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या.

कारवाईनंतर अनेक वर्षांपासून अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेला हा मार्ग तुलनेने मोकळा झाल्याचे चित्र दिसून आले. पालिकेने हटविलेल्या टपऱ्यांपैकी सात टपऱ्या जप्त करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

दुपारनंतर पालिकेच्या पथकाने पोलीस बंदोबस्तात मार्केट यार्डसमोरील गंमत जंमत परिसरातही अतिक्रमण हटाव मोहीम राबविली. यावेळी काही अतिक्रमणधारकांनी विरोध दर्शविल्याने किरकोळ शाब्दिक वाद झाले. मात्र पोलिसांच्या उपस्थितीत कारवाई सुरळीतपणे पार पडली.

राधिका रोड परिसरातील वाढती अतिक्रमणे आणि वाहतूक समस्यांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत होत्या. त्यानुसार पालिकेने ही कारवाई केली असून शहरातील इतर भागांतही अतिक्रमण हटाव मोहीम सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. मात्र या मार्गावरील अवजड वाहनांचे बेकायदा पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेचे प्रश्न सोडविण्याची मागणी नागरिकांकडून कायम आहे.

# कृष्णाच्या निवडणुकीतून सहा उमेदवारांची माघार

## आज अंतिम मुदत; राजकीय हालचालींना वेग, अंतिम लढतीचे चित्र होणार स्पष्ट

**कराड/प्रतिनिधी:-**

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारीच्या प्रक्रियेला वेग आला असून, सोमवारी विविध मतदारसंघांतील सहा उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. आज मंगळवारी (दि. ९) दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज माघारीची मुदत असल्याने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडी अधिकच गतिमान झाल्या आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, व्यक्तिगतरित्या ऊस उत्पादक गट क्रमांक १ (वडगाव हवेली-दुशेरे) मधून बाळासो आकराम जगताप आणि आप्पासाहेब ज्ञानदेव जगताप यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. तसेच गट क्रमांक २ (काले-कार्वे) मधून शरदराव गुणवंतराव पाटील व शशिकांत अशोक जाधव यांनी निवडणुकीतून माघार घेतली.

याशिवाय गट क्रमांक ५ (येडेमच्छिंद्र-वांगी) मधून प्रतापसिंह आनंदराव जाधव यांनीही आपला अर्ज मागे घेतला. इतर मागास प्रवर्ग राखीव मतदारसंघातून संजय बाबुराव शेवाळे यांनी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा निर्णय घेतल्याने संबंधित मतदारसंघातील समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा यादव यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया पार पडली. या घडामोडींमुळे अनेक मतदारसंघांतील स्पर्धेचे स्वरूप बदलले असून अंतिम उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर निवडणुकीतील खरे चित्र समोर येणार आहे. पान ४ वर

### मान्सून..

मान्सूनची चाहूल
आल्हाद देई मना
नव पालवी फुटते
अंतरंगा येई चेतना
हायहाय करी जन
भाजणा-या उन्हा
दयाआलीदयाघना
फुटे स्नेहाळ पान्हा
अंगाची लाहीलाही
खूपसोसली वेदना
सूर्य राजा होरपळी
बोथट करे संवेदना
कळते किंमत खरी
होता कधी यातना
दु:खा मुळे सुखाची
सुखी करी कल्पना
हिरवी आई भेटेलं
वाळल्या राना वना
ऋतुचक्र चालणारं
म्हणून अर्थ जीवना
वर्षाराणीस्वागतार्थ
जमा करे संसाधना
शिस्तबध्द रे पाऊस
फळास येते साधना
उशीर जरा यायला
विरह हा सोसवेना
चातकासम प्रतिक्षा
बरस त्वरे दयाघना

**- हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# कृष्णा कारखान्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणार

## डॉ.सुरेश भोसले; वाठारला सहकार पॅनेलची प्रचार सभा, पाणीपट्टीचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्नशील - आ. अतुल भोसले

**कराड/प्रतिनिधी:-**

गेल्या अकरा वर्षांत पारदर्शक प्रशासन, शेतकरीहिताचे निर्णय आणि विकासाभिमुख धोरणांच्या बळावर सभासदांचा विश्वास संपादन करण्यात यश मिळाले असून, कारखान्याला अधिक सक्षम आणि प्रगत बनविण्यासाठी शेतकरी सभासदांनी सहकार पॅनेलच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे. आम्ही निश्चितपणे कारखान्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही कृष्णा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी दिली.

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयवंतराव भोसले सहकार पॅनेलच्या प्रचारार्थ वाठार, ता. कराड येथे आयोजित प्रचार सभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी कराड दक्षिणचे आमदार अतुल भोसले, कृष्णा कारखान्याचे माजी चेअरमन मदनदादा मोहिते, व्हा. चेअरमन जगदीश




जगताप, उमेदवार दत्तात्रय देसाई यांच्यासह अन्य उमेदवार व मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सुरेश भोसले यांनी, कारखान्याने राबविलेल्या विविध योजनांचा आढावा घेत कारखान्याच्या पाणीपुरवठा योजनांमुळे हजारो सभासद शेतकऱ्यांच्या शेतीला मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे ऊस उत्पादनात मोठी वाढ झाली असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडल्याचे सांगितले. तसेच वाढत्या ऊस क्षेत्राचा विचार करून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली असून, आगामी काळात तब्बल १५ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तसेच सभासद शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा अधिक दर मिळावा, यासाठी व्यवस्थापन सातत्याने प्रयत्नशील राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी बोलताना आमदार डॉ. अतुल भोसले यांनी, कारखान्याच्या नेतृत्वाने दिलेल्या आश्वासनांची आणि केलेल्या कामांची आठवण करून दिली. २०१५ च्या निवडणुकीत सभासदांना ६० किलो मोफत साखर घरपोहोच देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. काही कारणांमुळे घरपोहोच सेवा देता आली नसली, तरी गावपातळीपर्यंत साखरेची पोती पोहोचविण्याचे काम प्रामाणिकपणे करण्यात आले असल्याचे सांगितले.

ते म्हणाले, केंद्र सरकारच्या एआयबीपी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील अपूर्ण आणि रखडलेल्या सहकारी सिंचन प्रकल्पांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यामुळे अनेक प्रकल्पांची कामे जलदगतीने पूर्ण होणार आहेत. परिणामी सिंचनक्षमता वाढून अधिक क्षेत्र ओलिताखाली येईल आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होईल. कृष्णा कारखान्याच्या पाणीपुरवठा योजनेलाही या माध्यमातून आर्थिक बळ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. विशेषतः योजनेवरील वीजबिलाचा आर्थिक भार कमी करून शेतकऱ्यांवरील पाणीपट्टीचा खर्च घटविण्यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

उमेदवार दत्तात्रय देसाई यांनी, आपल्या मनोगतात गेल्या दशकभरात कृष्णा कारखान्यात झालेल्या बदलांचा आणि विकासकामांचा आढावा घेतला. डॉ. सुरेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने आर्थिक स्थैर्य, औद्योगिक विस्तार आणि शेतकरी कल्याण या तीनही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली असल्याचे त्यांनी नमूद केले. कारखान्याच्या विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी आणि सभासदांच्या हिताच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी सहकार पॅनेलच्या सर्व उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित सभासदांना केले.

याप्रसंगी मान्यवरांनी विरोधकांच्या प्रचारातील आरोपांच्या मुद्यांचे खंडन करून कारखान्याच्या भावी विकासाचा आराखडा मांडला. सभेस वाठार व परिसरातील कारखान्याचे सभासद, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरातील कपाट फोडून सोन्याचे दागिने लंपास

**सातारा/प्रतिनिधी:-**

शहरातील बॉम्बे रेस्टॉरंट परिसरातील एका घरात चोरीची घटना घडून जवळपास ४८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्याने पळविल्याची नोंद झाली आहे.

चोरट्याने घरातील कपाटातून मंगळसूत्र आणि सोन्याचे झुमके असा ऐवज लंपास केला. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

# वनवासवाडीत ज्येष्ठाने गळफास घेऊन जीवन संपविले

**सातारा/प्रतिनिधी:-**

खेड परिसरातील वनवासवाडी येथे ६९ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

नातेवाईकांनी त्यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर मृत घोषित केले. या घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# संपादकीय

## इंडिया आघाडीची जुळवाजुळव

देशाच्या राजकारणात सत्ताधारी पक्ष जितका महत्त्वाचा असतो, तितकीच सशक्त विरोधी बाजूही आवश्यक असते. गेल्या काही वर्षांत भारतीय राजकारणात भाजपाने राष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व निर्माण केले असताना विरोधकांची विखुरलेली अवस्था अनेकदा चर्चेचा विषय ठरली. अशा पार्श्वभूमीवर ८ जून २०२६ रोजी नवी दिल्ली येथे झालेली इंडिया आघाडीची बैठक ही विरोधी पक्षांच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरवणारी एक महत्त्वपूर्ण घडामोड होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, ओमर अब्दुल्ला यांसारख्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती या बैठकीचे महत्त्व अधोरेखित करणारी होती. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आभासी माध्यमातून सहभाग घेतला, तर विविध प्रादेशिक पक्षांनीही या बैठकीकडे गांभीर्याने पाहिले. या बैठकीचा मुख्य उद्देश होता, भाजपविरोधी शक्तींना पुन्हा एकत्र आणणे, आगामी राजकीय आव्हानांवर चर्चा करणे आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकांसाठी एक व्यापक रणनीती आखणे.

मात्र या बैठकीकडे केवळ राजकीय अंकगणित म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. या बैठकीत मांडण्यात आलेले मुद्दे देशातील लोकशाही, संविधान, अर्थव्यवस्था, सामाजिक न्याय आणि त्यातून निर्माण होणारे राजकीय संकेत अधिक महत्त्वाचे ठरतात. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या भाषणात, केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर कठोर टीका केली. देशात नवीन गुंतवणूक अपेक्षित वेगाने येत नसल्याने रोजगारनिर्मितीवर परिणाम होत असल्याचे त्यांनी म्हटले. भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचा दावा सरकारकडून केला जात असला, तरी बेरोजगारी, महागाई आणि गुंतवणुकीतील मंदी या वास्तवाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तरुण वर्गामध्ये वाढत्या बेरोजगारीबद्दल असंतोष दिसत आहे. सरकारी भरती परीक्षा, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि अस्थिरता यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अनिश्चिततेत सापडले आहे. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरव्यवस्थापनाचा मुद्दा उपस्थित केला तो योग्यच आहे. विरोधकांना बेरोजगार युवकांमधील असंतोष हा मुद्दा राजकीयदृष्ट्या प्रभावी वाटत असल्याने आगामी काळात तो आक्रमकपणे मांडला जाऊ शकतो.

या बैठकीतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संविधान, लोकशाही संस्था आणि मतदारसंघ फेररचना हा होय. गेल्या काही महिन्यांपासून मतदारसंघांच्या फेररचनेच्या विषयावर देशभरात चर्चा सुरू आहे. विशेषतः दक्षिण भारतातील राज्यांमध्ये आणि काही प्रादेशिक पक्षांमध्ये या प्रक्रियेबाबत संशय आणि चिंता व्यक्त केली जात आहे. लोकसंख्येच्या आधारे जागांचे पुनर्वाटप झाल्यास काही राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अलीकडील संसदीय चर्चांमध्ये याच मुद्द्यावर सविस्तर भूमिका मांडली आहे. महिला आरक्षण, मतदारसंघ फेररचना आणि सामाजिक प्रतिनिधित्व हे परस्पर जोडलेले विषय असल्याचा त्यांचा दावा आहे. महिलांना राजकीय आरक्षण देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करतानाच त्यांनी त्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा त्यांचा आरोप केवळ राजकीय भाष्य नसून लोकशाही प्रक्रियेबाबतची एक गंभीर शंका आहे.

भारतीय लोकशाहीमध्ये वैविध्य आहे. जाती, धर्म, भाषा, प्रदेश आणि संस्कृतींच्या असंख्य स्तरांवर लोकशाही उभी आहे. त्यामुळे प्रतिनिधित्वाचा प्रश्न संवेदनशील ठरतो. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढविणे ही संविधानाची मूलभूत अपेक्षा आहे. परंतु, या प्रक्रियेत एखाद्या गटाचे प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता निर्माण झाली, तर त्यावर सखोल चर्चा होणे आवश्यक ठरते. विरोधकांच्या भूमिकेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर. अंमलबजावणी संचालनालय (इडी ), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय ) आणि इतर संस्थांचा वापर राजकीय विरोधकांवर दबाव आणण्यासाठी होत असल्याची विरोधकांकडून होत असलेल्या आरोपाची पुनरावृत्ती होत असल्याने त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. मात्र, या बैठकीने विरोधकांपुढील अंतर्गत आव्हानेही उघड केली आहेत. तृणमूल काँग्रेसमधील कथित अंतर्गत मतभेद, द्रमुकचा बहिष्कार आणि विविध प्रादेशिक पक्षांमधील परस्पर स्पर्धा हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही. भाजपविरोधी भूमिका हा एक समान धागा असला, तरी प्रत्येक पक्षाचे प्रादेशिक हितसंबंध वेगळे आहेत. अनेक राज्यांमध्ये हेच पक्ष एकमेकांविरोधात निवडणुका लढवतात. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर एकजूट दाखवणे आणि प्रत्यक्ष निवडणूक रणनीती राबवणे यामध्ये मोठा फरक आहे.

भाजपने या बैठकीवर प्रतिक्रिया देताना इंडिया आघाडी ही कल्पनेतील गोष्ट असल्याचे म्हटले. या आघाडीबाबत गांभीर्य दिसत नसल्याचा भाजपचा दावा आहे. राजकीय दृष्टिकोनातून हा दावा पूर्णपणे निराधार नाही. कारण २०२४ नंतर अनेक राज्यांमध्ये विरोधकांना अपेक्षित यश मिळालेले नाही. तसेच नेतृत्वाचा प्रश्न, जागावाटप आणि समान कार्यक्रम यांबाबतही अनेक मतभेद कायम आहेत. मजबूत सत्ताधारी पक्षाविरुद्ध विरोधकांची एकजूट ही अनेकदा निवडणुकांचे समीकरण बदलू शकते. १९७७ मधील जनता पक्षाचा प्रयोग असो, १९८९ मधील राष्ट्रीय आघाडी असो किंवा २००४ मधील संयुक्त पुरोगामी आघाडी असो, मतदारांनी वेळोवेळी सत्ताधाऱ्यांना पर्याय दिला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीला केवळ संख्याबळाच्या आधारावर नाकारता येणार नाही. या बैठकीचा महत्त्वाचा संदेश म्हणजे विरोधकांनी अजूनही लढण्याची तयारी सोडलेली नाही. संसदेत सीमांकन विधेयकाविरोधात दाखविलेली एकजूट, सामाजिक न्यायाचा मुद्दा, जातनिहाय जनगणनेची मागणी, महिला आरक्षणाची अंमलबजावणी आणि संविधान रक्षणाचा दावा यांद्वारे विरोधक एक व्यापक राजकीय एकजूट उभी करत आहेत, असे दिसते.

परंतु, केवळ सरकारवर टीका करून पर्याय निर्माण होत नाही. विरोधकांनी जनतेसमोर स्पष्ट आर्थिक धोरण, रोजगारनिर्मितीची ठोस योजना, सामाजिक न्यायाचा व्यावहारिक आराखडा आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबतची विश्वासार्ह भूमिका मांडणे आवश्यक आहे. अन्यथा, ती टीका केवळ राजकीय स्वरूपाची होऊ शकेल. देशात एकीकडे मजबूत नेतृत्व आणि स्थिर सरकारचा दावा आहे; तर दुसरीकडे लोकशाही संस्थांचे रक्षण, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. या दोन बाबींमधील संघर्ष पुढील काही वर्षांत तीव्र होण्याची शक्यता आहे. दिल्लीतील इंडिया आघाडीची बैठक ही त्या संघर्षाची प्रारंभिक नांदी मानता येईल. ही बैठक विरोधकांच्या पुनरुज्जीवनाची सुरुवात ठरेल की त्यांच्या अस्तित्वासाठीचा आणखी एक प्रयत्न ठरेल, हे भविष्यात स्पष्ट होईल. मात्र एवढे निश्चित आहे की, २०२९ ची लढाई आजपासूनच सुरू झाली आहे आणि त्या लढाईत लोकशाही, प्रतिनिधित्व, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास हेच मुख्य मुद्दे असणार आहेत.

# वाळू माफियांचा विळखा



**सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात रविवारी पहाटे घडलेली घटना ही केवळ अवैध वाळू वाहतुकीवर झालेली एक कारवाई नाही, तर प्रशासन आणि वाळू माफिया यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षाचे जिवंत चित्र आहे. देशमुखवाडी परिसरातील माण नदीपात्रातून अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांचा तहसीलदार शितल बंडगर यांनी तब्बल दीड तास पाठलाग करून त्यांचा डाव उधळून लावला. या धाडसी कारवाईने प्रशासनाचा निर्धार स्पष्ट केला असला, तरी दुसरीकडे वाळू माफियांचे वाढते धाडस आणि त्यांना मिळणाऱ्या कथित संरक्षणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.**



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

नदीपात्रातील वाळू ही केवळ बांधकामासाठी वापरली जाणारी नैसर्गिक संपत्ती नाही, तर पर्यावरणीय संतुलन राखणारा महत्त्वाचा घटक आहे. अनियंत्रित वाळू उपशामुळे नदीचे नैसर्गिक प्रवाह बदलतात, भूजल पातळी खालावते, शेतीवर परिणाम होतो आणि पूरस्थितीची जोखीम वाढते. त्यामुळे शासनाने वाळू उत्खननासाठी कठोर नियम लागू केले आहेत. मात्र या नियमांना हरताळ फासत अनेक भागांत अवैध वाळू उपसा आणि वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे वास्तव आहे. आटपाडीतील कारवाईत महसूल पथकाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना रोखण्याचा प्रयत्न केला असता चालकांनी वाहनांसह पलायन केले. विशेष म्हणजे, पाठलागादरम्यान महसूल पथकाला अडवण्यासाठी विविध ठिकाणी इतर वाहने उभी करून अडथळे निर्माण करण्याचाही प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. कारण यावरून अवैध वाळू व्यवसाय हा काही व्यक्तींचा स्वतंत्र उद्योग नसून त्यामागे संघटित जाळे कार्यरत असल्याची शक्यता बळावते.

**प्रशासनाच्या सुरक्षेचे काय ?**

तहसीलदार शितल बंडगर यांनी दाखविलेली तत्परता आणि धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे. अनेकदा अशा कारवायांमध्ये अधिकारी आणि कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करतात. राज्यात यापूर्वी अनेक ठिकाणी वाळू माफियांनी सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. अहमदनगर, पुणे, नाशिक, औरंगाबादसह अनेक जिल्ह्यांमध्ये महसूल अधिकारी, पोलिस कर्मचारी आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर प्राणघातक हल्ले झाल्याची उदाहरणे आहेत. काही अधिकाऱ्यांना जीव गमवावा लागला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. त्यामुळे आटपाडीतील घटनेकडे केवळ कारवाई म्हणून न पाहता प्रशासनाच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. वाळू माफियांचे जाळे इतके मजबूत कसे झाले, हा प्रश्न उपस्थित होतो. अवैध वाळू व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असल्याने अनेक ठिकाणी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक हितसंबंधांची साखळी निर्माण झाल्याचे आरोप वारंवार होत असतात. त्यामुळे एखादी कारवाई झाल्यानंतर काही दिवस शांतता दिसते; मात्र पुन्हा त्याच पद्धतीने अवैध उत्खनन सुरू होते. यावरून समस्या केवळ कायद्याची नसून व्यवस्थेतील त्रुटींचीही असल्याचे स्पष्ट होते.

आटपाडी तालुक्यात यापूर्वीही शासकीय कारवायांना विरोध झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना विरोध करण्यात आला होता. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांबद्दल काही घटकांमध्ये भीतीपेक्षा दबाव निर्माण करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते. ही लोकशाही व्यवस्थेसाठी धोकादायक बाब आहे. जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष आणि उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा परिणाम दिसून येत असला, तरी केवळ अधूनमधून होणाऱ्या कारवायांनी समस्या संपणार नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण आणि समन्वयात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. महसूल विभाग, पोलिस यंत्रणा, परिवहन विभाग आणि स्थानिक प्रशासन यांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापरही या लढ्यात महत्त्वाचा ठरू शकतो. ड्रोन सर्वेक्षण, जीपीएस ट्रॅकिंग, सीसीटीव्ही नेटवर्क आणि डिजिटल परवानगी प्रणालीच्या माध्यमातून अवैध उत्खननावर अधिक प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. अनेक राज्यांनी या पद्धतीचा अवलंब करून सकारात्मक परिणाम मिळविले आहेत. महाराष्ट्रातही अशा उपाययोजनांना अधिक गती देण्याची आवश्यकता आहे.

महत्त्वाचे म्हणजे, कारवाईनंतर न्यायालयीन आणि दंडात्मक प्रक्रिया जलद होणे गरजेचे आहे. अनेकदा वाहने जप्त होतात, गुन्हे दाखल होतात; परंतु दीर्घकाळानंतर प्रकरणे थंडावतात. त्यामुळे गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण होत नाही. कठोर आणि तातडीच्या कारवाईमुळेच अवैध व्यवसायांना आळा बसू शकतो. आटपाडीतील ताज्या घटनेने एक सकारात्मक संदेश दिला आहे. प्रशासनाने इच्छाशक्ती दाखविली, तर अवैध व्यवसायांना आव्हान देता येते. तहसीलदार शितल बंडगर आणि त्यांच्या पथकाने केलेली कारवाई ही केवळ कर्तव्यपूर्ती नसून सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करण्याचा आदर्श प्रयत्न आहे. मात्र अशा अधिकाऱ्यांना केवळ कौतुक नव्हे, तर सक्षम सुरक्षा आणि संस्थात्मक पाठबळ मिळणे तितकेच आवश्यक आहे. आज गरज आहे ती वाळू माफियांविरुद्ध कडक भूमिका स्वीकारण्याची. नैसर्गिक संसाधनांची लूट थांबविणे, शासनाचा महसूल वाचविणे आणि कायद्याचे राज्य टिकवून ठेवणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. आटपाडीतील कारवाईने या लढ्याला नवी दिशा दिली असली, तरी अंतिम विजयासाठी सातत्य, राजकीय इच्छाशक्ती आणि जनसहभाग या तिन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या ठरणार आहेत. वाळू माफियांच्या विरोधातील ही कारवाई केवळ एका तालुक्यापुरती मर्यादित न राहता संपूर्ण राज्यासाठी एक संदेश ठरली पाहिजे. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही आणि सार्वजनिक संपत्तीची लूट कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही.

# महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे योगदान

**श्री. हितेंद्र साळुंखे**
**सहाय्यक ग्रंथपाल विवेकानंद कॉलेज कोल्हापूर**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रूपाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या अलौकिक कार्याचे स्मरण सर्वांना व्हावे म्हणून दरवर्षी ९ जून हा दिवस शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा जयंती दिन म्हणून अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. या निमित्ताने महाराष्ट्रभर पसरलेल्या संस्थेच्या विविध ज्ञानमंदिरातून गुरुदेव कार्यकर्ते संस्थेमध्ये एकत्र येऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेतात आणि ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्यासाठी सकारात्मक उर्जा घेऊन नव्या उमेदीने परत आपापल्या शाखेवर जातात. या प्रसंगी संस्थेच्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांसाठी शैक्षणिक, सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गुरुदेव कार्यकर्त्यांच्या साथीने महाराष्ट्राच्या उस्मानाबाद ,पुणे ,सातारा ,रायगड कोल्हापूर, सोलापूर सांगली ,रत्नागिरी, सिंधुदुर्ग ,पेण, बेळगाव अशा जिल्ह्यांमध्ये ज्ञान मंदिरे उघडून येथील सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाची सोय केली. हे सर्व करीत असताना त्यांच्या नशिबी मान-अपमान, कष्ट, उपासमार हे सर्व आले पण त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपली शिक्षणाची गंगा दारोदारी पोहोचविण्याचे कार्य बंद पडू दिले नाही. त्यामुळेच आज महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत बापूजींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे .

अगदी साधे वागणे व बोलणे हे बापूजींचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या या साधेपणामुळे सामान्य कार्यकर्तेही त्यांच्यासोबत अगदी निर्मळ मनाने वावरत असत. अंगीकृत कार्य मनापासून व न कंटाळता प्रामाणिकपणे करणे हीच खरी ईश्वर सेवा आहे ही त्यांची मनोधारणा होती. आजच्या युवा पिढीला बापूजींच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू मार्गदर्शक ठरू शकतील. सत्य, प्रामाणिकपणा, सेवा आणि त्याग पिळवणूक प्रवृत्तीस आळा या मौलिक निष्ठा जीवनात उतरवण्यासाठी सुसंस्कारी शिक्षण घेतले पाहिजे . आपले आचार विचार व उच्चार हे पवित्र असले पाहिजेत असे त्यांना वाटे.


शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या या १०८ व्या जयंती दिनाच्या कार्यक्रमासाठी दि. ९ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. प्रमुख पाहुणे प्रा.मिलिंद जोशी, प्रसिध्द लेखक व वक्ते यांचे 'शिक्षण - काल, आज आणि उद्या' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. प्रमुख पाहुणे म्हणून मा.खासदार धनंजय महाडिक हे उपस्थित राहाणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे आहेत. या कार्यक्रमानंतर दुपारी २.०० ते ४.३० या वेळेत संस्थेच्या गुरुदेव कार्यकर्त्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

माणसाने जीवनात चांगले कर्म केल्याने त्याला समाजात मोठेपणा प्राप्त होतो. भगवद् गीता सांगते माणूस जन्माने मोठा नसून कर्माने मोठा होतो. समाजकार्याला फारच थोडी माणसे वाहून घेतात आणि दीर्घकाळ सर्वांच्या स्मरणात राहतात. असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बापूजी साळुंखे. दीन दलित व बहुजन समाजातील मुला मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा , विद्यार्थी स्वावलंबी व सुसंस्कारी बनावे, त्यांनी स्वतःच्या विकासाबरोबरच समाज व देशाच्या प्रगतीस हातभार लावावा ज्ञानवंत व गुणवंत असे विद्यार्थी घडवणे हे बापूजींचे ध्येय होते आणि ते ध्येय पूर्ण करण्यासाठीच शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात मिळून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या जवळपास ४१० शाखांद्वारे दहा लाख विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे धडे देऊन विद्यार्थी घडवण्याचे कार्य अखंडपणे सुरू आहे व त्याचेच फलित म्हणून आज पर्यंतच्या ७२ वर्षांच्या कालावधीत या संस्थेच्या विविध शाखातून शिकलेले विद्यार्थी आज देशाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातच नव्हे तर परदेशातही मोलाची कामगिरी करीत आहेत व संस्थेचे नाव उज्वल करीत आहेत. त्यामुळेच आज ही शिक्षणसंस्था महाराष्ट्रातील एक नामंकित व गुणवंत शिक्षणसंस्था होत आहे.

बापूजीनी केलेल्या शिक्षण प्रसाराच्या कार्याचा गौरव म्हणून शासन व विविध संस्था यांनी बापूजींना मानपत्र दिले. महाराष्ट्र शासनातर्फे 'दलित मित्र' म्हणून त्यांना गौरवण्यात आले शिवाजी विद्यापीठाकडून 'डी.लीट ' ही पदवी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. बापूजींच्या शैक्षणिक कार्याची नोंद घेऊन शासनानेही त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करावा अशी अनेक गुरुदेव कार्यकर्त्यांची मनस्वी इच्छा आहे.

या संस्थेव्दारे इंजिनिअरींग, नर्सिंग, हॉटेल मॅनेजमेंट, लॉ कॉलेज याचबरोबर अनेक नवनवीन व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु केले असून आधुनिक शिक्षण देऊन स्वावलंबी व रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरु आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे हे संस्थेच्या



शैक्षणिक विकासासाठी सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांसमवेत कार्यरत आहेत. संस्थेतील सर्व जाती धर्मातील गुरुदेव कार्यकर्त्यांची बापूजींनी एखाद्या कुटुंब प्रमुखाप्रमाणे काळजी घेतली होती. त्यामुळे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांचा मिळून एक मोठा संस्था परिवार निर्माण झाला आहे व या परिवाराचे श्रद्धास्थान म्हणून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना प्रत्येकाच्या हृदयात एक मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. आज त्यांच्या या जयंतीदिनी माझे विनम्र अभिवादन.

## पाळीव कुत्रीवर कथित अत्याचार; एकावर गुन्हा दाखल

**ईश्वरपूर / प्रतिनिधी**

पाळीव मादी कुत्रीवर कथित लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी चंद्रकांत साहेबराव गायकवाड (वय ३५, रा. राजारामनगर, ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तम पवार यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी हा राजारामनगर, साखराळे (ता. वाळवा) येथे वास्तव्यास असून मूळचा पानगाव (ता. कळंब, जि. धाराशिव) येथील असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपीने फिर्यादीची 'चिमी' नावाची गावठी जातीची पाळीव मादी कुत्री आपल्या घरी नेऊन तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्राथमिक तपास पोहेकॉ. जाधव यांनी केला असून पुढील तपास पोउपनि. मिसाळ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# माणूस घडविणाऱ्या शिक्षणाचा महर्षी-डॉ.बापूजी साळुंखे



**डॉ. स्वप्निल बुचडे**
**श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय कापशी**

९ जून रोजी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०८ वी जयंती यानिमित्त ग्रामीण व बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविणाऱ्या या ज्ञानतपस्वींच्या कार्याचा आणि विचारांचा घेतलेला हा वेध.

शिक्षण ही केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून माणूस घडविण्याची साधना आहे, या विचारावर आयुष्यभर निष्ठा ठेवणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील तेजस्वी पर्व आहेत. ग्रामीण, वंचित आणि बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा ध्यास घेऊन त्यांनी उभारलेली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आजही त्यांच्या विचारांची साक्ष देत उभी आहे.

९ जून १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर येथे त्यांचा जन्म झाला. बालपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. लहान वयातच मातापित्यांचे छत्र हरपले; मात्र प्रतिकूलतेसमोर न झुकता त्यांनी शिक्षणाचा मार्ग निवडला. कष्ट, जिद्द आणि ज्ञानाची ओढ यांच्या बळावर त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांच्यावर इतिहास, संस्कृत आणि राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला. डॉ. आप्पासाहेब पवार यांसारख्या विद्वानांचा सहवास लाभला आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील आणि नागनाथअण्णा नायकवडी यांच्यासारख्या नेत्यांसोबत कार्य केले. देशसेवेची ही प्रेरणा पुढे समाजसेवेच्या व्यापक कार्यात रूपांतरित झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत कार्य करताना ग्रामीण शिक्षणाच्या प्रश्नांची त्यांना जवळून जाणीव झाली. याच अनुभवातून स्वतंत्र शैक्षणिक चळवळीची बीजे त्यांच्या मनात रुजली.

१९ ऑक्टोबर १९५४ रोजी कराड येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना झाली. स्वामी विवेकानंदांच्या मानवतावादी आणि राष्ट्रनिर्माणाच्या विचारांनी प्रेरित होऊन बापूजींनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' हे संस्थेचे ब्रीदवाक्य त्यांच्या व्यापक शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे.

संस्थेच्या माध्यमातून त्यांनी दुर्गम भागात शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे उभारली. शिक्षणाची गंगा जिथे पोहोचली नव्हती, त्या डोंगरदऱ्यांत आणि खेड्यापाड्यांत ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला. आज संस्थेच्या ४१० शाखांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अगदी केजीपासून पदव्युत्तर आणि संशोधन स्तरापर्यंत शिक्षणाच्या विविध संधी निर्माण झाल्या आहेत. या कार्यामुळे असंख्य विद्यार्थ्यांना नवे आयुष्य आणि नवी दिशा मिळाली.

बापूजींचे व्यक्तिमत्त्व केवळ शिक्षणसंस्थांचे निर्माते म्हणून मर्यादित नव्हते. ते मानवतावादी विचारवंत होते. साधेपणा, प्रामाणिकता, चारित्र्य, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी ही त्यांच्या जीवनाची मूलतत्त्वे होती. महात्मा गांधी आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा त्यांच्यावर खोल प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी शिक्षणाला मूल्यांशी जोडले. त्यांच्या मते शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट सुजाण, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविणे हेच होते.

आज शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा झपाट्याने विस्तार होत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल शिक्षणामुळे अनेक संधी उपलब्ध होत असल्या, तरी मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा काळात बापूजींची शिक्षणदृष्टी विशेष मार्गदर्शक ठरते. ज्ञानासोबत विज्ञान आणि सुसंस्कार यांचा समतोल राखण्याचा त्यांचा आग्रह आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

८ ऑगस्ट १९८७ रोजी बापूजींची प्राणज्योत मालवली; परंतु त्यांचे विचार आजही जिवंत आहेत. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील हजारो गुरुदेव कार्यकर्ते आणि लाखो विद्यार्थी त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत आहेत. शिक्षण, संस्कार आणि मानवतेचा संदेश देणारे बापूजी आजही महाराष्ट्राच्या शैक्षणिक विश्वात प्रेरणेचे दीपस्तंभ म्हणून उभे आहेत.

आज शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाची नवी आव्हाने उभी आहेत. अशा काळात ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांचा समतोल साधणारी बापूजींची शिक्षणदृष्टी अधिकच महत्त्वाची ठरते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करण्याबरोबरच त्यांच्या विचारांची पेरणी नव्या पिढीत करणे, हीच त्यांना वाहिलेली सर्वात अर्थपूर्ण आदरांजली ठरेल.

# सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राऊत देशमुख मैदानात

## खरी फाईट पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यातच

**सोलापूर/महेश गायकवाड:–**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत बार्शीच्या राजेंद्र राऊत आणि पंढरपूर चे वसंतराव देशमुख यांच्यात खरी फाईट आहे. परंतु मैदानात, उतरले आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अकलूजचे मोहिते पाटील घराणे यामुळे निवडणूक मोठी चुरशीची झाली आहे.

खरी फाईट पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यातच... लागल्यामुळे या निवडणुकी कडे आख्या राज्याचे लक्ष लागले आहेत. भाजपचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हे तर निवडणुकी नंतर बघणार असल्याचे म्हणत थेट चेलेंज दिले आहेत तर माजी आमदार सातपुते यांनी मोहिते पाटील पुन्हा भाजप च्या नादाला



लागणार नाहीत अशी अवस्था करू अशी धमकी दिली आहेत तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही मोहिते पाटील यांच्याकडे निवडणुका झाल्यावर बघतो असे म्हटले आहे त्यामुळे सोलापूर मध्ये निवडणूक दोघात लागली आहे पण राजकारणाने मोहिते पाटील विरुद्ध सोलापूर जिल्ह्यातील सर्व नेते मंडळी मंत्री मंत्री आमदार अशी झाली आहे.

भाजप उमेदवार राजेंद्र राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार वसंतराव देशमुख यांच्यात विधान परिषदेसाठी लढत होत आहे. लढत जरी राऊत-देशमुख यांच्यात असली तरीही या निकालावर पालकमंत्री जयकुमार गोरे व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची प्रतिष्ठा ठरणार आहे. या निवडणुकीत जरी राऊत-देशमुखांचा समोरा-समोर असले तरी खरी फाईट मात्र गोरे-मोहिते-पाटील यांच्यातच होणार आहे

मागील अनेक वर्षांपासून मोहिते-पाटील व गोरे यांच्यातील राजकीय संघर्ष सुरूच आहे. मागील लोकसभा निवडणुकीत हा संघर्ष मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळाला. त्यातच सोलापूरचे पालकमंत्री पद जयकुमार गोरे यांना मिळाल्यामुळे या वादाला आणखीन तोंड फुटल्याचे संबंध सोलापूरने पाहिले आहे. त्याचबरोबर मागेच पार पडलेल्या सर्वच निवडणुकांमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आपली निवड सार्थ ठरवली आहे. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या पालकमंत्री जयकुमार गोरे आणि मोहिते पाटील अशीच फाईट खरे तर पाहायला मिळत आहे. त्यामुळे सध्या सोलापूर विधान परिषदेसाठी लागलेल्या निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे.

# आज गोवा येथील नानोरा बिचोलीम येथे अन्नछत्र न्यासाच्या श्री दत्त मंदिराचा जिर्णोध्दार व भूमिपूजन

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

आज गोवा येथील नानोरा बिचोलीम येथे अन्नछत्र न्यासाच्या श्री दत्त मंदिराचा जिर्णोध्दार व भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अन्नछत्र न्यासाच्या वतीने देण्यात आली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विस्तार भक्ताभिमुख होत आहे. याचाच एक भाग म्हणून संस्थेने गोवा येथील नानोरा बिचोलिम गट नं.४८७/६ या जागेत नियोजित श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन कार्यक्रम मंगळवार दि.९ जुन २०२६ रोजी सायं.५ वा. संपन्न होणार आहे.

गोवा येथे बहुसंख्येने श्री स्वामी समर्थांचे भक्त असून ते श्री स्वामी अन्नछत्र मंडळाशी जोडलेले आहेत. गोवा येथील नानोरा बिचोलिम येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या जागेत श्री दत्त मंदिर होते. याचा जीर्णोद्वार व्हावा म्हणून तेथील स्वामीभक्तांची मागणी होती. ती श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून पूर्ण होत आहे.

हा कार्यक्रम गोवा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री रोहन खवटे, न्यासाचे संस्थापक



अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, म्हापसा गोवाचे माजी महापौर रोहन कवळेकर, मुंबईचे माजी नगरसेवक विजय तांडेल, उद्योगपती मनोज गंगावणे, कल्याण, तुकाराम शेठ म्हात्रे, नगरसेवक, उद्योगपती, बदलापूर, लक्ष्मण पालेकर, उद्योगपती, गोवा, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांनी दिली आहे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ✻मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ✻ सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# खातगुण-कटगुणचा सुपुत्र दक्षिण आफ्रिकेत गाजवणार मैदान!

## जगातील सर्वात खडतर 'कॉम्रेड्स मॅरेथॉन'साठी संजय काळूखे सज्ज

**पुसेगाव/प्रतिनिधी:–**

शब्दांना सत्याची धार आणि ध्येयाला कष्टाची जोड असेल, तर आभाळही ठेंगणे होते, याचाच प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. जगातील सर्वात जुनी, अत्यंत खडतर आणि मानवी सहनशक्तीचा अंत पाहणारी दक्षिण आफ्रिकेतील आंतरराष्ट्रीय 'कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६' यंदा गाजवण्यासाठी कल्याणसह सातारा जिल्ह्याच्या मातीचा सुपुत्र सज्ज झाला आहे. कटगुण (ता. खटाव) गावचे रहिवासी आणि खातगुण येथील वेदावती विद्यालयाचे माजी विद्यार्थी संजय काळुखे हे आपल्या दोन सहकाऱ्यांसह या जागतिक महासंग्रामात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

विशेष म्हणजे, अत्यंत प्रतिकूल आणि हालाकीच्या परिस्थितीतून जिद्दीच्या जोरावर घेतलेली झेप आहे. खातगुण सोसायटीचे माजी चेअरमन तथा कांदा-बटाट्याचे प्रसिद्ध होलसेल व्यापारी विजय लावंड यांचे परम व घनिष्ठ मित्र आहेत संजय काळुखे यांच्या मॅरेथॉन स्पर्धेच्या निवडीची बातमी समजताच विजय लावंड यांचे सह खातगुण परिसरात अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला.

**१४ जून रोजी दक्षिण आफ्रिकेत थरार; 'हार मानू नका'ची थीम**

आगामी १४ जून २०२६ रोजी या प्रतिष्ठित कॉम्रेड्स मॅरेथॉनची ९९ वी आवृत्ती रंगणार आहे. यंदाची स्पर्धा 'अप रन' (चढाईप) स्वरूपाची असून, धावपटूंना डर्बन ते पिटरमारित्झबर्ग दरम्यान तब्बल ८५.७७ किलोमीटरचे डोंगर-दऱ्यांचे अत्यंत कठीण अंतर धावून पूर्ण करावे लागणार आहे. दक्षिण आफ्रिकन संस्कृतीतील 'स्का फेला मोया' म्हणजेच 'हार मानू नका!' ही यंदाची थीम असून, संजय साळुंखे आणि त्यांचे सहकारी ही थीम मैदानावर खरी करून दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

**कल्याणचे तीन 'रुद्र'; डॉ. शहादपुरी, डॉ. बाभळे आणि संजय साळुंखे**

या जागतिक आव्हानासाठी संजय साळुंखे यांच्यासोबत कल्याणचे डॉ. सोमनाथ बाभळे आणि डॉ. हरीश शहादपुरी हे दोन खंदे शिलेदार मैदानात उतरत आहेत. या स्पर्धेत पात्रता मिळवणे हेच मुळात एका युद्धापेक्षा कमी नाही. पूर्ण मॅरेथॉन (४२.२ किमी) अवघ्या ५ तासांच्या आत पूर्ण करणाऱ्या जागतिक धावपटूंनाच यात प्रवेश मिळतो. यंदा जगभरातील २२ हजार जागा अवघ्या १० तासांत फुल्ल झाल्या होत्या, यावरून या शर्यतीची क्रेझ स्पष्ट होते.

कल्याणचे डॉ. हरीश शहादपुरी हे चौथ्यांदा, तर डॉ. सोमनाथ बाभळे आणि साताऱ्याच्या मातीचे सुपुत्र संजय साळुंखे हे तिसऱ्यांदा या अत्यंत कठीण



अशा जागतिक स्पर्धेत भारताचा तिरंगा फडकवणार आहेत. हे तिघेही 'रनहोलिक्स' ग्रुपअंतर्गत डॉ. योगेश सातव यांच्या कडक मार्गदर्शनाखाली अनेक महिन्यांपासून रक्ताचे पाणी करून कठोर सराव करत आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने कामगिरी करत संजय साळुंखे यांनी आपल्या मूळ सातारा जिल्ह्यासह कल्याणचे नावही जागतिक नकाशावर कोरले आहे. १४ जूनच्या या महाशर्यतीकडे आता संपूर्ण महाराष्ट्रातील क्रीडाप्रेमींचे डोळे लागले असून, या त्रिकुटावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




# पत्रकारांबद्दल अपशब्द वापरणाऱ्या वाहतूक निरीक्षकाचे निलंबन

**महाबळेश्वर /संजय चोरगे :–**

महाबळेश्वर आगारातील एका घटनेत पत्रकारांबद्दल अपशब्द वापरल्याचा आरोप झालेल्या वाहतूक निरीक्षकावर राज्य परिवहन महामंडळाने तात्काळ कारवाई करत निलंबनाची कार्यवाही केली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात आल्याची माहिती विभाग नियंत्रक, एस.टी. महामंडळ, सातारा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

प्राप्त माहितीनुसार, दि. ७ जून २०२६ रोजी महाबळेश्वर बसस्थानकावर वाहतूक निरीक्षक शाहरुख खान आणि प्रवासी तसेच पत्रकार मित्र यांच्यामध्ये बस उशिरा सुटल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादादरम्यान संबंधित वाहतूक निरीक्षकाने पत्रकार बांधवांविषयी अपशब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला.

या प्रकाराची माहिती वरिष्ठ पातळीवर पोहोचल्यानंतर एस.टी. महामंडळाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली. पत्रकारांबद्दल अवमानकारक भाषा वापरणे तसेच प्रवाशांशी अयोग्य वर्तन करणे हे महामंडळाच्या प्रतिमेला धक्का पोहोचवणारे असल्याचे मानून संबंधित वाहतूक निरीक्षक शाहरुख खान यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

यासोबतच एस.टी. महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रवासी, पत्रकार आणि नागरिकांशी सौजन्यपूर्ण व जबाबदारीने वागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक सेवेशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिस्त, संयम आणि सभ्यतेचे पालन करणे आवश्यक असल्याचेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या कारवाईमुळे पत्रकार संघटना व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, सार्वजनिक सेवेत कार्यरत अधिकाऱ्यांनी जबाबदारीचे भान ठेवून वागावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वाकुर्डे योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात

## रणधीर नाईक

**शिराळा /प्रतिनिधी:–**

वाकुर्डे बुद्रुक योजना टप्पा तीनचे काम अंतिम टप्प्यात आले असून जून, जुलै महिन्यात पाण्याची टेस्टिंग होइल अशी माहिती माजी जि. प. सदस्य रणधीर नाईक यांनी दिली.

वाकुर्डे जिल्हा परिषद गटातील भटवाडी ,बांबवडे व पाचुंब्री येथील आढावा बैठकी वेळी नाईक बोलत होते. तर थेट ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या विविध समस्या, अडचणी व विकासकामांच्या मागण्या समजावून नाईक व जि प. सदस्या राजेश्वरी नाईकव पं. स. सदस्य सविता महाडिक यांनी घेतल्या.

रणधीर नाईक म्हणाले, जून, जुलै महिन्यात वाकुर्डे बुद्रुक योजनेच्या टप्पा तीनच्या पाण्याचे टेस्टिंग होणार असल्याची चर्चा संबधित पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांशी झाली असून पुढील वर्षांपासून शेती, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संपणार

राजेश्वरी नाईक म्हणाल्या, ग्रामस्थांशी संवाद साधून जे विकास कामांचे नियोजन केले आहे.त्याचे जिल्हा परिषदमध्ये प्राधान्याने मंजूर करून मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



वाकूर्डे जिल्हा परिषद गटातील भटवाडी ,बांबवडे व पाचुंब्री येथील आढावा बैठकी वेळी रणधीर नाईक, राजेश्वरी नाईक, सविता महाडिक आदी ग्रामस्थ

यावेळी गावातील नागरिकांनी पाणीपुरवठा, रस्ते, वीज, गटारी, रस्ते पाणंद, संरक्षण भिंती, स्मशानभूमी, ग्रामपंचायतीला नवीन इमारत, शासकीय योजनांचा लाभ इतर मूलभूत सुविधांबाबतच्या समस्याची ग्रामस्थांनी माहिती दिली.

यावेळी, उद्योगपती संजय पाटील, भीमराव माने, भानुदास माने सरपंच भीमराव ताटे, दौलत जाधव, चंद्रकांत हिंगणे, सौ मंगल झेंडे,सौ कमल माने, सुरेश मोरे सुकुमार पाटील, आत्माराम हिंगणे, मानसिंग मोरे अमोल जाधव, विजय हिंगणे, भीमराव मोरे, संभाजी हिंगणे, रमेश पाटील, राजकुमार पाटील, चंद्रकांत पाटील, हर्षद माने, भगवान पाटील, बजरंग कुंभार, बाळासो पाटील, उत्तमराव सवाखंडे, संतोष पाटील, सचिन दरेकर, राजेंद्र पाटील, तुषार झेंडे, भीमराव पाटील, प्रकाश साठे, डॉक्टर प्रशांत माने, राहुल शहा, प्रकाश पाटील, बाबासो पाटील, वसंतराव कदम, पूजा सुतार, चंद्रकला पाटील, भारती सवाखंडे, सविता पाटील, नथुभाऊ पाटील आश्विनी कुंभार, सरपंच राणी गावडे, ग्रामसेवक प्रमोद माळी, उपसरपंच कृष्णात खबाले, कृषी सहाय्यक विशाल पाटील, तलाठी अंजून सिकंदर, मच्छिंद्र चव्हाण, सतीश चव्हाण, प्रताप चव्हाण, दत्तात्रय चव्हाण, सुरेश चव्हाण, काकासो देशमुख, बजरंग चव्हाण, अंगणवाडी सेविका, जि.प.शाळा मुख्याध्यापक इत्यादी उपस्थित होते तर ग्रामसेवक डॉक्टर साजिद मुल्ला ,तलाठी राजश्री महालिंगपुरे, कृषी सहाय्यक ज्योती बडदे आरोग्य सेवक वैभव देवकर महावितरण सहाय्यक विठ्ठल कांबळे पोलीस पाटील धनंजय माने. कृषी सखी नम्रता गायकवाड अंगणवाडी सेविका, मुख्याध्यापक, रोजगार सेवक, डाटा ऑपरेटर व शासकीय कर्मचारी आदी मान्यवरयावेळी उपस्थित होते.

# वीज कर्मचाऱ्यांची सामाजिक बांधिलकी ;५६ जणांचे रक्तदान

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

ऊन, वारा, पाऊस अशा कोणत्याही परिस्थितीत स्वतःच्या जीवाची आणि कुटुंबाची पर्वा न करता ग्राहकांना अखंड वीजपुरवठा देण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या वाळवा तालुक्यातील वीज अधिकारी, कर्मचारी आणि लाईनमन यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचा आदर्श उपक्रम राबविला.

महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस (इंटक) संघटनेच्या त्रैमासिक सभेनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ५६ पदाधिकाऱ्यांनी रक्तदान केले. प्रकाश शिक्षण, आरोग्य व उद्योग समूहाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे आयोजन प्रकाश शिक्षण, आरोग्य व उद्योग समूहाचे संस्थापक निशिकांत भोसले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश ब्लड बँकेच्या वतीने करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे स्वागत विभागीय सचिव अमित कुंभार यांनी केले, तर प्रास्ताविक सर्कल उपसेक्रेटरी गजानन चव्हाण यांनी केले. इंटक संघटनेचे राज्य खजिनदार पी. एस. पाटील आणि सर्कल सेक्रेटरी संजय वाघ यांनी संस्थेच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा घेत संघटनेच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी उपस्थितांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले.

संघटनेचे ज्येष्ठ नेते सुरेश कांबळे यांनी ग्राहकांना प्रामाणिक व दर्जेदार सेवा देणे हेच संघटनेचे प्रमुख कर्तव्य असल्याचे सांगितले. निशिकांत भोसले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना प्रत्येक वीज कामगाराच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली असून, अन्यायाविरोधात आणि न्यायासाठी सातत्याने संघर्ष करत असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने वेळ आणि योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजीराव माने, सुभाष पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंदराव पाटील यांनी केले.

कार्यक्रमास एस. एन. चौगुले, आर. एन. डफळे, सुनील गायकवाड, कपिल गायकवाड, संतोष थोरात, सचिन चव्हाण, शब्बीर पटेल, अवधूत तेवरे तसेच विटा, ईश्वरपूर, सांगली अर्बन व सांगली ग्रामीण विभागातील पदाधिकारी, शाखा सचिव, उपशाखा सचिव, चेअरमन, संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिराचे नियोजन प्रकाश ब्लड बँकेचे डॉ. निखील घुगरे, डॉ. भाग्यश्री हजारे, जनसंपर्क अधिकारी देवदत्त पाटील, टेक्निशियन अतुल एटंबे, धनश्री जाधव, सुकेश उरुणकर तसेच नर्सिंग स्टाफ रोहिणी तवटे यांनी केले. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सेवानिवृत्तीनिमित्त संजय निंबाळकरांचा गौरव

## सैदापुरात आ. मनोज घोरपडे यांच्या हस्ते सत्कार

**कराड/प्रतिनिधी : –**

ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना लोकांच्या समस्या तत्परतेने सोडवत गावाच्या विकासात मोलाचे योगदान देणारे संजय निंबाळकर यांचा सैदापूर येथे सेवानिवृत्तीनिमित्त गौरव करण्यात आला. आमदार मनोज घोरपडे यांच्या हस्ते झालेल्या या सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी निंबाळकर यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलताना आमदार घोरपडे म्हणाले, ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील दुवा म्हणून ग्रामविकास अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. लोकांच्या अडीअडचणी समजून घेत त्या सोडविण्याची कार्यपद्धती संजय निंबाळकर यांनी आपल्या सेवाकाळात जपली. त्यामुळे त्यांनी प्रशासनात एक आदर्श निर्माण केला असून अशा लोकाभिमुख अधिकाऱ्यांची आज गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी आमदार आनंदराव पाटील यांनी, सैदापूरच्या वाढत्या लोकसंख्येचा उल्लेख करत गावासमोरील नागरी सुविधांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. सुमारे ४० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या सैदापूरच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे नगरपंचायतीच्या मागणीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी



अविनाश फडतरे, गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार, विजय विभूते, निवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एन. उबाळे, महसूल अधिकारी युवराज पाटील, माजी गटविकास अधिकारी देशमुख, हिंदकेसरी संतोष वेताळ, रामकृष्ण वेताळ, प्रकाश पाटील, शंकरराव खापे, प्रदीप पाटील, निवासराव थोरात, प्रवीण जाधव, रणजित जाधव, नगरसेविका नीलम कदम, भीमराव डांगे, सरपंच फत्तेसिंह जाधव, उपसरपंच अनिल जाधव, मोहनराव जाधव, मानसिंग जाधव, एस. आर. मुल्ला यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना संजय निंबाळकर यांनी, आपल्या सेवाकाळातील अनुभव मांडत ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी जयराज व वैष्णवी निंबाळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मोहनराव जाधव यांनी प्रास्ताविक, तर विजय माने यांनी सूत्रसंचालन केले.

# पेठ नाका येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जण गंभीर

## चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

राष्ट्रीय महामार्गावर पेठ नाका येथे कोल्हापूर नाक्यावर एका अज्ञात टोचन वाहन चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून बसची वाट पाहत थांबलेल्या तरुणाला धडक दिली. यात अक्षय रघुनाथ माने(वय३०) रा.राजारामनगर ता.वाळवा हा तरुण गंभीर जखमी झाला.या प्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात अज्ञात टोचन वाहनाच्या चालकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय रघुनाथ माने हे २५ मे २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.१० वाजण्याच्या सुमारास गोवा येथे कार्यालयीन कामानिमित्त जाण्यासाठी एस.टी. बसची वाट पाहत पेठ नाका येथील कोल्हापूर नाक्यावर उभे होते.

यावेळी कराडच्या दिशेकडून आलेल्या एका अज्ञात टोचन वाहन चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या उजव्या पायाला जोरदार धडक दिली. या अपघातात अक्षय माने यांच्या गुडघ्याचे लिगामेंट तुटून गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर चालकाने जखमीस वैद्यकीय उपचारासाठी न नेता घटनास्थळावरून पलायन केले.

त्यांच्या पत्नी सौ. ऋतुजा अक्षय माने (वय २६) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ईश्वरपूर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपास करीत आहेत.

# अभियंत्याच्या खुनप्रकरणी ..

पान १ वरुन

या कटामध्ये सारिका मंडले आणि तिचा भाऊ संग्राम चव्हाण यांनीही सक्रिय भूमिका बजावल्याचे तपासातून पुढे आले आहे. मात्र, हत्येसाठी आकाशला नेमकी किती रक्कम देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, तसेच या कटात आणखी कोणाचा सहभाग होता का?, याचा शोध पोलीस घेत आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे करीत आहेत. या कारवाईसाठी पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक वैशाली कडूकर आणि पोलीस उप अधीक्षक राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कराड शहर पोलिस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने विशेष मेहनत घेतली.

## यवतेश्वर घाटात मद्यधुंद अवस्थेत गोंधळ; युवकाविरुद्ध गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

यवतेश्वर घाट परिसरात सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्या युवकावर सातारा तालुका पोलिसांनी कारवाई केली.सिमेंटच्या कट्ट्यावर बसून तो मद्यधुंद अवस्थेत गोंगाट करत असल्याचे आढळून आले. सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जितेंद्र वाघमारे यांचे निधन

**सातारा/प्रतिनिधी : –**

येथील गुरूवार पेठ ढोरगल्लीतील जितेंद्र बाबुराव वाघमारे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने ५७ व्या वर्षी निधन झाले. कामगार सचिन यांचे ते वडील होत. सर्व मुकादम, कामगार व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थिती अंत्यसंस्कार करण्यात आला. उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली.



# शूरवीर जिवाजी महाले कुटुंबाच्या समर्थनार्थ साताऱ्यात निवेदन आंदोलन

## तक्रारीची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी ; संबंधितांना कायदेशीर संरक्षण देण्याचे आवाहन

**सातारा/प्रतिनिधी:–**

शूरवीर जिवाजी महाले यांच्या कुटुंबातील एका महिलेविरोधात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर शिवरक्षक शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने सोमवारी साताऱ्यात निवेदन आंदोलन करण्यात आले. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे, तसेच संबंधित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

कोंडवली (ता. वाई) येथे शूरवीर जिवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याचे काम विविध संस्था आणि मान्यवरांच्या सहकार्याने सुरू आहे. या स्मारकासाठी श्रीकांत शिंदे फाउंडेशन तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आला असून कुटुंबालाही मदत करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

यावेळी शिवरक्षक शौर्य




प्रतिष्ठानचे संस्थापक व राज्याध्यक्ष मंगेश काशीद यांनी भूमिका मांडताना, संबंधित तक्रारीमुळे महिलेच्या सामाजिक आणि कौटुंबिक आयुष्यावर परिणाम होत असल्याचे सांगितले. या प्रकरणात कोणावरही अन्याय होऊ नये आणि वस्तुस्थिती जनतेसमोर यावी, यासाठी प्रशासनाने निष्पक्ष तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात तक्रारीची सखोल चौकशी करावी, चौकशीत निष्पन्न होणाऱ्या बाबींनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, संबंधित महिलेला आवश्यक संरक्षण द्यावे तसेच समाजात संभ्रम किंवा तेढ निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. यासोबतच प्रकरणाशी संबंधित तांत्रिक पुरावे व संपर्क नोंदींची तपासणी करून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. या आंदोलनात कृष्णत जाधव, दत्तात्रय तावरे, गणेश कदम, चंद्रकांत सपकाळ, नवनाथ काशीद, बजरंग काशीद, रवी पवार, धनाजी गायकवाड, जीवन मसुरकर, तुषार काशीद, आदिक कदम, चंद्रकांत गायकवाड, नारायण सरडे, राजेंद्र शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्हाधिकारी सातारा आणि पोलीस अधीक्षक सातारा यांना पाठविण्यात आल्या आहेत. संबंधित प्रकरणात न्याय्य आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.



# उत्तम वेताळ यांनी समाजकारणालाही दिशा द्यावी

## रामकृष्ण वेताळ

**कराड/प्रतिनिधी : –**

भारतीय सैन्य दलात, तसेच सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र शासनामध्ये प्रामाणिकपणे कर्तव्य बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असलेल्या उत्तम वेताळ यांनी समाजकारणालाही दिशा द्यावी, असे प्रतिपादन भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी केले.

करवडी, ता. कराड येथे उत्तम वेताळ यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी हिंदकेसरी पै. संतोष वेताळ, जिल्हा परिषद सदस्य विद्याताई वेताळ, कराड पंचायत समितीच्या उपसभापती अनिता वेताळ, माजी सरपंच नीता वेताळ, जिल्हा सैनिक कार्यालय रत्नागिरी सुभेदार काटे, भिमराव ढमाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरूली येथील उत्तम वेताळ यांनी भारतीय सैन्य दलामध्ये आपली सेवा बजावली. यानंतर त्यांनी सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र शासन येथेही आपली सेवा बजावली. नियत कालावधीनुसार ते सेवानिवृत्त होत झाले.

कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्या विद्या वेताळ यांनी उत्तम वेताळ यांना सेवानिवृत्ती निमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला सुर्ली गावातील नागरिकांसह उत्तम वेताळ यांचे आप्तेष्ट, मित्र आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामपंचायत मौजे शामगांव**

**ता.कराड, जि.सातारा**

ग्रामपंचायत मौजे शामगांव कडील खालील नमुद कामाची निविदा मान्यता प्राप्त निविदा धारकाकडून मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम रूपये | निविदा फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तम पोळ ते वामन माळी २)सिद्धेश्वर मंदिर ते दिलीप कोळी यांच्या घरापर्यंत गणेश तुकाराम पोळ ते ओंकनाथ मंदिर ४) हणमंतत फाटक ते कल्पना पोळ यांच्या घरापर्यंत गटर्स सफाई गटर्स दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | २५००००/- | २५००/- | ५००/- | ६ महिने |
| २ | १)शिवाजी सदाशिव यादव यांचे घर ते वाकनाथ शिंदे यांचे घरापर्यंत २) जगन्नाथ विठ्ठल पोळ यांचे घर ते अधिक बाबू पोळ यांचे घरापर्यंत ३)सचिन हिंदुराव पोठ यांचे घर ते धनाजी परबती पोळ यांचे घरापर्यंत अबंधित रस्ता बांधकाम व दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ३२२४७०/- | ३२२४/- | ५००/- | ६ महिने |

कामाच्या अटी व शर्ती:

१)कामाचे निविदा फॉर्म जाहिरात प्रसिद्ध केले पासून १५/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून मिळतील.
२)कामाची निविदा स्वतंत्र व सीलबंद लखोट्यात कामाचे नाव नमूद करून दि.१५/०८/२०२६ दुपारी ३.०० वा पर्यंत स्वीकारली जाईल.
३)सर्व शासकीय कपाती ह्या बिलातून कपात केल्या जातील.
४)निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार ग्रा.पं.शामगांव यांनी राखून ठेवला आहे.
५)कामाची संबंधित अंदाजपत्रके कार्यालयीन वेळेत ग्रा.पं.शामगांव येथे पहावयास मिळतील.
६)काम वेळेत पूर्ण न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
७)अंदाजपत्रकातील तरतुदी प्रमाणे काम न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
८)लखोटा क्र.१ मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रे, छायांकित प्रत व बयाणा रक्कम चलन जोडणे तद्नंतर लखोटा क्र.२ उघडणेत येईल.

सदर कामी विहित मुदतीत न आलेल्या बयाणा रक्कम न भरलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच दरपत्रके सीलबंद करून कामनिहाय नाव व पत्यासह देणे.

**सही/–**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत शामगांव**
**ता.कराड जि.सातारा**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत शामगांव**
**ता.कराड जि.सातारा**

# सोलापुरातील गुन्हेगारांवर मोठी कारवाई

## एकाच दिवशी आठ जणांची सोलापुरातून तडीपारी

**सोलापूर/महेश गायकवाड :–**

सोलापुरात पोलिस आयुक्त कार्यालयात डी सी पी प्रीतमकुमार यावलकर हे आल्या पासून चोरांचे अवैध धंदे वाल्यांचे आणि गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. सोलापूर मध्ये डी सी पी प्रीतमकुमार यावलकर यांच्या कडे आलेल्या तक्रारीनुसार आणि अहवालानुसार एकाच दिवशी आठ जणांची सोलापुरातून तडीपारी करण्यात आली आहे एवढ्या मोठ्या प्रमाणावर तडीपार ची कारवाई करण्यात आल्यामुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. सोलापुरातील सराईत गुन्हेगारानो सावध व्हा अन्यथा सोलापूर सोडून जा असा संदेश या मोठ्या तडीपारी मधून देण्यात आला आहे. एकाच दिवशी आठ जणांची सोलापुरातून तडीपारी झाली यात खतरनाक गुन्हेगार सलमान सय्यद यास सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे तर एम आय डी सी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जमादार टोळीमधील सहा जणांवर पोलिसांनी तडीपार ची कारवाई केली असून या सर्वांना सोलापूर जिल्ह्याच्या बाहेर हाकलण्यात आले आहे.



शहरात गैरकायद्याची मंडळी जमा करून दंगा करणे, सरकारी नोकरांच्या कामात अडथळा आणणे आणि सामान्य नागरिकांना मारहाण करून दहशत निर्माण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारावर सोलापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. सलमान गुलाब सय्यद (वय २९, रा. जुना बोरामणी नाका, रविवार पेठ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून पुढील दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सलमान सय्यद याच्याविरुद्ध सन २०१८, २०२०, २०२५ आणि २०२६ या कालावधीत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कारवायांमुळे जेलरोड पोलीस ठाण्याच्या वतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये तडीपारीचा प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांच्याकडे सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावाची गंभीर दखल घेत पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर यांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आदेश जा.क्र. १४३५/२०२६ दिनांक ०५/०६/२०२६ अन्वये सलमान सय्यद याला दोन वर्षांकरिता सोलापूर शहर व जिल्हा हद्दीतून तडीपार करण्याचे आदेश जारी केले आहेत.शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी सोलापूर पोलीस प्रशासनाकडून अशा प्रकारची कडक पावले उचलली जात आहेत.

# खटाव तालुक्यात रंगणार 'आमदार केसरी' बैलगाडी शर्यत

## १० जून रोजी भुरकवडी फाट्यावर थरार

**पुसेगाव/प्रतिनिधी : –**

खटाव तालुक्यातील भुरकवडी फाटी येथील ओपन मैदानावर भव्य बैलगाडी शर्यत आमदार केसरी' (पर्व ३ रे)चे जंगी आयोजन करण्यात आले आहे. स्व. पंढरीनाथ फडके यांच्या स्मरणार्थ ही थरारक शर्यत बुधवार, दिनांक १० जून २०२६रोजी पार पडणार असून, यामध्ये महाराष्ट्रभरातील नामांकित बैलगाड्या आणि शौकीन आपले नशीब आजमावणार आहेत.

या भव्य स्पर्धेचे आयोजन विकास (आबा) जाधव मित्र समूह, पुसेगाव आणि १०१० सरकार विगर पनवेल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आमदार केसरी मैदानाला प्रमुख उपस्थिती श्रीमंत १०८ प.पू.सुंदरगिरीजी महाराज (मठाधिपती, श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्ट, पुसेगाव) आमदार महेश शिंदे (उपाध्यक्ष, कृष्णा खोरे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य) सौ. प्रियाताई महेशजी शिंदे (अध्यक्ष, जि.प. सातारा), गुरुनाथ शेठ फडके १०१० सरकार, पुसेगाव पोलीस अधिकारी एन.जे. खुणे, माजी जिल्हा परिषद सदस्य मानाजी घाडगे उपस्थित राहणार आहेत.

या शर्यतीमध्ये पहिल्या ७ क्रमांकांसाठी भव्य रोख बक्षिसे आणि आकर्षक ढाली दिल्या जाणार आहेत. बक्षिसांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे: प्रथम क्र. १,००,०१/- बक्षीस आहे आणि अनुक्रमे सात क्रमांकला उत्कृष्ट बक्षीस आहेत. क्वार्टर फायनल आणि मेगा फायनलमधील विजेत्यांसाठी देखील स्वतंत्र रोख बक्षिसे (१०,०१० ते २,०१०) आणि ढाली ठेवण्यात आल्या आहेत.

# निवडणूक खर्चातील भ्रष्टाचाराविरोधात पाटण तहसील कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात

## तरन्नुम चाऊस यांचा उपोषणाचा पहिला दिवस

**पाटण/प्रतिनिधी:–**

२०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुक खर्चात पाटण तालुक्यात कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचाराच्या बाबतीत कोणतीही शहानिशा खातरजमा न करता बोगस न झालेल्या खर्चावर बिले अदा केलेली आहेत. जनतेच्या पैश्यांची वारेमाप उधळपट्टी झाली आहे. निवडणूक बिल्लांना कोणतेही ऑडिट अथवा तपासणी नसल्या कारणाने प्रशासकीय यंत्रणेची एक प्रकारे चंगळच असते. हा जनतेचा पैसा आहे. अशा खर्चाला देखील मर्यादा हव्यात. मात्र पाटण तालुक्यात निवडणूक खर्चावर कुठे मर्यादा दिसत नाहीत. निवडणूक खर्चात झालेला भ्रष्टाचार उघड करुन दोषींवर कारवाईच्या मागणी करत सौ. तरन्नुम अब्दुल रज्जाक चाऊस यांनी पाटण तहसिल कार्यालयासमोर सोमवार दि. ८ जून २०२६ पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.



सौ. तरन्नुम चाऊस यांनी पुढे म्हणले आहे निवडणूक प्रक्रियेत ठेकेदार व काही अधिकारी - कर्मचाऱ्यांनी संगनमत करून अव्वाच्या सव्वा बिले काढून जनतेच्या पैशाची लूट केली आहे. जोपर्यंत या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी होऊन दोषींवर गुन्हे दाखल होत नाहीत आणि लुटलेला पैसा शासनदरबारी जमा होत नाही, तोपर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही, असा निर्धार उपोषणकर्त्या तरन्नुम चाऊस यांनी यावेळी व्यक्त केला.

दरम्यान, उपोषणाच्या पहिल्याच दिवशी विविध पक्ष व संघटनांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे या आंदोलनाला बळ मिळाले असून, प्रशासन आता काय भूमिका घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. या उपोषणाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर, शहराध्यक्ष चंद्रकांत बामणे, राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष विकास कदम, संभाजी ब्रिगेड पाटण तालुका, पाटण तालुका पत्रकार संघ तसेच अनेक सामाजिक व राजकीय संघटनांच्या प्रतिनिधींनी भेट देऊन जाहीर पाठिंबा दर्शविला. उपोषणस्थळी दिवसभर नागरिक व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती.

मुख्य मागण्या : १. २०२४-२५ मधील लोकसभा व विधानसभा निवडणूक खर्चाची सखोल चौकशी करावी. २.अव्वाच्या सव्वा बिले काढणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. ३. भ्रष्टाचारातून लुटलेला जनतेचा पैसा वसूल करून शासनाच्या तिजोरीत जमा करावा.

### प्रसार माध्यमांवर लाखोंचा खर्च..
### खर्च पाहून माध्यमांच्या प्रतिनिधींना धक्का
### पत्रकार संघाचा उपोषणाला पाठिंबा

निवडणूक काळात मतदार जनता आणि प्रशासकीय यंत्रणेमधील प्रसार माध्यमे ही दुवा असतात. निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निकालाच्या अंतिम टप्प्या पर्यंत सर्व अपडेट्स प्रसार माध्यमांच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणा मतदार जनतेला पोहचवत असते. या काळात जेमतेम चार पाच वेळा पत्रकार परिषदांचे आयोजन केले जाते. आणि अंतिम निवडणूक निकालावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना वेगळे दालन केले जाते. हे सारासार पहाता किमान पाच ते जास्तीत जास्त पंधरा हजार रुपये पर्यंत येणारा खर्च लाखोंच्या पट्टीत दाखवल्याने प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी देखील अवाक झाले आहेत. निवडणूक खर्चात प्रसार माध्यमे प्रतिनिधींच्या नजरेत धुळफेक झाली असून सौ. तरन्नुम चाऊस यांच्या उपोषणाला पत्रकार संघाने देखील पाठींबा दिला आहे.

### महिला उपोषणास बसूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

एक महिला आमरण उपोषणास तहसील कार्यालयाच्या समोर बसलेली आहे दिवसभर या कार्यालयातील उपोषण स्थळी कोणीही फिरकले नाही. भ्रष्टाचाराविरोधात संबंधित महिला न्याय मागताना लोकशाही मार्गाने चाललेल्या या उपोषणाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे अशी मागणी होत आहे.

# विट्यातील भाविकांच्या गाडीला सुरूरजवळ अपघात तिघे जखमी

**वाई/प्रतिनिधी : –**

जेजुरी येथे खंडोबाचे देवदर्शन उरकून आपल्या गावी सांगलीकडे परतणाऱ्या भाविकांच्या गाडीला सातारा-पुणे हायवेवर सुरूर (ता. वाई) गावच्या हद्दीत भीषण अपघात झाला. बोलेरो गाडी महामार्गावरील डिव्हायडरला जोरात धडकल्याने हा अपघात घडला असून, यामध्ये २ ते ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात दि. ७ जून रोजी रात्री ७:४५ वाजण्याच्या सुमारास हॉटेल साई पार्क इनच्या समोर झाला.



याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा येथील संदीप संपत शिरतोडे, राजापूर (बोरगाव) येथील महादेव मोहन मदने आणि त्यांचे इतर नातलग असे एकूण ८ ते १० जण बोलेरो गाडी मधून जेजुरीला देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन आनंदाने गावी परतत असताना, सुरूर गावच्या हद्दीत चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने बोलेरो थेट महामार्गाच्या डिव्हायडरला जाऊन धडकली. धडक इतकी भीषण होती की गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी आणि महामार्ग पोलिसांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. गाडीतील जखमींना तातडीने बाहेर काढून प्राथमिक उपचारासाठी कवठे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, २ ते ३ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील आणि अधिक उपचारासाठी सातारा येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच भुईंज पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या अपघाताचा पुढील अधिक तपास भुईंज पोलीस करत आहेत.

## कृष्णाच्या निवडणुकीतून सहा उमेदवारांची माघार

**पान १ वरुन**

दरम्यान, अर्ज माघारीच्या अंतिम दिवसाकडे सर्वांचे लक्ष लागले असून आणखी काही उमेदवार माघार घेण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कारखान्याच्या निवडणुकीतील अंतिम लढतीची उत्सुकता शिगेला पोहोचली असून सभासदांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रचाराचा धुरळा उडण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पुणे ग्रामीण पोलीस दलात मोठे फेरबदल! बारामती तालुक्यातील चार पोलीस ठाण्यांना नवे प्रभारी

## कायदा-सुव्यवस्थेच्या बळकटीसाठी नियुक्त्या; नव्या अधिकाऱ्यांसमोर गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्याचे आव्हान

**बारामती/ प्रतिनिधी :–**

पुणे ग्रामीण पोलीस दलात मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदल करण्यात आले असून तब्बल ३० अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. या फेरबदलांत बारामती तालुक्यातील तिन पोलीस ठाणे आणि वाहतूक शाखेला नवीन प्रभारी अधिकारी मिळाले आहेत. त्यामुळे आगामी काळात तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नव्या अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.



श्री.नारायण पवार पोलीस निरीक्षक बारामती तालुका पोलीस ठाणे | श्री.महेश स्वामी पोलीस निरीक्षक बारामती वाहतूक शाखा | श्री. कुलदीप संकपाळ सहाय्यक पोलीस निरीक्षक माळेगाव पोलीस ठाणे | श्री.जीवन मोहिते सहाय्यक पोलीस निरीक्षक वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे

बदल्यांच्या आदेशानुसार बारामती तालुका पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदावर पोलीस निरीक्षक नारायण पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर बारामती वाहतूक शाखेच्या प्रभारी पदाची जबाबदारी पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. माळेगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदावर सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी जीवन मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या फेरबदलांमुळे बारामती शहर आणि सुपे पोलीस ठाणे वगळता तालुक्यातील इतर चार प्रमुख ठिकाणी नवीन प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनात नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, यापूर्वी बारामती तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी असलेले पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची बदली शिक्रापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तसेच बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक निलेश माने यांना भोर पोलीस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. माळेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांची पदोन्नतीसह बदली पुणे शहर पोलीस आयुक्तालयात करण्यात आली असून त्यांच्या बदलीनंतर काही काळ माळेगाव पोलीस ठाण्याचा अतिरिक्त कार्यभार निलेश माने यांच्याकडे होता. तसेच वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील यांची बदली पुणे नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे.

पुणे ग्रामीण पोलीस दलातील या बदल्यांमुळे बारामती तालुक्यातील पोलीस यंत्रणेला नवे नेतृत्व मिळाले आहे. वाढती गुन्हेगारी, अवैध धंदे, वाहतूक शिस्त तसेच कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने लक्षात घेता नव्याने नियुक्त झालेले अधिकारी आपल्या कार्यशैलीतून ठसा उमटवतील का?, तसेच गुन्हेगार आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर प्रभावी वचक निर्माण करतील का?, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. आगामी काळात या अधिकाऱ्यांच्या कामगिरीवरूनच तालुक्यातील पोलीस प्रशासनाची दिशा आणि परिणामकारकता ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

# आषाढी वारी २०२६ साठी प्रशासन सज्ज

## ५,५०० एसटी गाड्यांचे नियोजन;नदीपात्रात वॉच टॉवर,वारकऱ्यांना मिळणार अधिक दर्जेदार सुविधा

**सोलापूर/प्रतिनिधी : –**

आषाढी वारी २०२६ सुरक्षित, सुव्यवस्थित आणि संस्मरणीय करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी एक टीम म्हणून काम करावे. वारकरी व भाविकांना मागील वर्षाच्या तुलनेत अधिक चांगल्या आणि उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी केले.



येथील केपीबी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी २०२६ आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वारी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नदीपात्रात स्नानासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दोन ते तीन वॉच टॉवर उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून यावर्षीच्या आषाढी वारीसाठी तब्बल ५,५०० बसांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी सर्व विभागांमध्ये प्रभावी समन्वय असणे आवश्यक असल्याचे सांगत, वारी कालावधीत कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने रजा घेऊ नये तसेच मोबाईल बंद ठेवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. यंदाची आषाढी वारी अधिक नियोजनबद्ध, सुरक्षित आणि भाविकाभिमुख करण्यासाठी प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली असून सर्व विभागांनी जबाबदारीने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# अवैध खाजगी वाहतूकदारांविरोधात एसटीचा सर्जिकल स्ट्राईक

## कोरेगाव, रहिमतपूर बसस्थानक परिसरात कारवाईची धडाका

**पुसेगाव/प्रतिनिधी : –**

एसटी महामंडळाच्या उत्पन्नाला खिळ घालणाऱ्या आणि बसस्थानक परिसरात तळ ठोकून बसणाऱ्या अवैध खाजगी वाहतूकदारांविरोधात कोरेगाव आगार प्रशासन आणि सातारा वाहतूक शाखेने संयुक्तपणे सर्जिकल स्ट्राईक केला आहे. कोरेगाव तसेच रहिमतपूर बसस्थानक परिसरात राबवलेल्या या धडक मोहिमेमुळे खाजगी वाहनचालकांची प्रचंड पळापळ झाली असून, प्रशासनाने बेधडक कारवाई करत हे संपूर्ण आवार खाजगी वाहनांपासून मुक्त केले आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे (एसटी) आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी आणि प्रवाशांची खाजगी वाहनांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व मुख्य वाहतूक अधिकारी श्रीमती प्रियांका नारनवरे यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून कोरेगाव आगाराच्या कार्यक्षेत्रात ही धडक कारवाई करण्यात आली.

कोरेगाव आगार प्रमुख श्रीमती नीता जगताप यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अधिकारी आणि पोलिसांच्या पथकाने अचानक बसस्थानक परिसरात धाडी टाकल्या. प्रवाशांची पळवापळवी करणाऱ्या आणि स्थानकाच्या नियमांचा भंग करणाऱ्या खाजगी वाहनांवर कडक कायदेशीर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. प्रशासनाचा हा आक्रमक पवित्रा पाहून अनेकांनी आपली वाहने घेऊन तेथून पळ काढला.



या यशस्वी आणि धडक मोहिमेत कोरेगाव आगाराचे वाहतूक अधीक्षक श्री. प्रल्हाद मदने, वाहतूक निरीक्षक श्री. नितीश कुमार पवार, सातारा वाहतूक शाखेचे वाहतूक निरीक्षक श्री. आशुतोष चव्हाण आणि सातारा सुरक्षा व दक्षता शाखेच्या (राखण व पहारा) निरीक्षक श्रीमती श्वेता गायकवाड यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून ही कारवाई पूर्ण केली.

बसस्थानक परिसर हा केवळ आणि केवळ एसटी महामंडळाच्या बसेस व अधिकृत प्रवाशांसाठी आहे. या ठिकाणी जर पुन्हा कोणी अवैध वाहतूक किंवा खाजगी वाहने पार्क करून प्रवाशांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, तर यापुढे गाड्या जप्त करून थेट गुन्हे दाखल केले जातील, असा स्पष्ट आणि कडक इशारा आगार प्रशासनाने दिला आहे.

# विटा येथील जुन्या मार्केटच्या स्लॅबचा भाग कोसळला

## मोठी दुर्घटना टळली,पालिकेकडून परिसर सील

**विटा/प्रतिनिधी:–**

खानापूर तालुक्यातील विटा शहराच्या मध्यवर्ती गांधी चौक परिसरातील जुन्या मार्केट इमारतीच्या स्लॅबचा काही भाग सोमवारी दुपारी अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, दोन नागरिक थोडक्यात बचावल्याने मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



विटा शहरातील गांधी चौक हा व्यापारी आणि नागरिकांच्या वर्दळीचा प्रमुख केंद्रबिंदू मानला जातो. १९७२ साली उभारण्यात आलेल्या या जुन्या मार्केटमध्ये सुमारे ४८ गाळे असून अनेक दशकांपासून व्यापारी येथे व्यवसाय करत आहेत. शहरातील मुख्य बाजारपेठ म्हणून या परिसराची ओळख असल्याने दिवसभर येथे नागरिकांची मोठी गर्दी असते.

सोमवारी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास मार्केट इमारतीच्या स्लॅबचा काही भाग अचानक कोसळला. घटना घडताच परिसरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. अचानक झालेल्या या पडझडीमुळे काही काळ परिसरात धावपळ आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेच्या वेळी त्या ठिकाणी असलेले दोन नागरिक थोडक्यात बचावल्याने मोठी जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच विटा नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच बांधकाम विभाग आणि अतिक्रमण विभागाचे पथक त्वरित दाखल झाले. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने सुरक्षेच्या उपाययोजना राबविल्या.

स्लॅब कोसळलेल्या भागालगतचा रस्ता आणि परिसरातील काही दुकाने तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच नागरिकांनी त्या भागात येऊ नये यासाठी कर्मचारी तैनात करण्यात आले. काम सुरू असून परिसर धोकादायक आहे, त्यामुळे नागरिकांनी सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आले. दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान पालिकेच्या पथकाने धोकादायक अवस्थेत असलेला स्लॅबचा उर्वरित भाग हटविण्याची प्रक्रिया सुरू केली. भविष्यात पुन्हा पडझड होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. व्यापाऱ्यांनाही सुरक्षिततेच्या कारणास्तव दुकाने बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# शिवकालीन पाणंद रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात

## न्यायासाठी ग्रामस्थांचे उपोषण ; वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कारवाईस टाळाटाळ


**कराड/प्रतिनिधी : –**

कोयनावसाहत ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक शिवकालीन पाणंद रस्त्यावर झालेल्या कथित अतिक्रमणामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून, प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात ग्रामस्थांनी उपोषण सुरु केले आहे. या संदर्भात काकासो ऊर्फ संजय शिवराम चव्हाण यांनी तहसीलदार कल्पना ढवळे यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, कोयनावसाहत येथील उत्तर-दक्षिण जखिणवाडी रोड, घुणकी, मातोश्री पतसंस्था, डी-मार्ट ते म्हसोबा चौक असा जाणारा शिवकालीन पाणंद रस्ता ग्रामपंचायतीच्या अभिलेखातील नमुना क्रमांक २३ मध्ये नोंद असून, हा रस्ता सुमारे १७१० फूट लांब आणि ३३ फूट रुंद आहे. या मार्गावरून परिसरातील शेकडो नागरिकांची दररोज वर्दळ असते. मात्र, रस्त्यालगतच्या काही हिस्सेदारांनी सुमारे ४०० मीटर लांबी आणि १३ फूट रुंदीपर्यंत अतिक्रमण केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतूक कोंडी निर्माण होत असून, वाहनधारक व नागरिकांना रोजच त्रास सहन करावा लागत आहे. किरकोळ कारणांवरून वाहनचालकांमध्ये वादविवादही होत असल्याने सामाजिक सलोखा धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी कोयनावसाहत ग्रामपंचायतीने सप्टेंबर २०२५ मध्ये तहसील कार्यालयाकडे छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत अतिक्रमण हटविण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये स्मरणपत्रही देण्यात आले. तसेच चव्हाण यांनी, एप्रिल २०२६ मध्ये आवश्यक कागदपत्रे व पुरावे जोडून स्वतंत्र निवेदन सादर केले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने ग्रामस्थांसह मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच उपोषणादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. शिवकालीन पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करून नागरिकांसाठी खुला करण्यात यावा आणि या प्रकरणी तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.


विनम्र अभिवादन




शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक – संस्थापक
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
यांच्या १०८ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन...

डॉ. महेश गायकवाड
प्रभारी प्राचार्य
आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे
सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी



विनम्र अभिवादन




शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक – संस्थापक
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
यांच्या १०८ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन...

प्रो.डॉ. सतिश घाटगे
प्राचार्य
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड
सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी



विनम्र अभिवादन




शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक – संस्थापक
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
यांच्या १०८ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन...

डॉ.अविनाश नलवडे
प्रभारी प्राचार्य
लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,सातारा
सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी



विनम्र अभिवादन



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक – संस्थापक
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
यांच्या १०८ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन...

डॉ.उषादेवी साळुंखे
प्रभारी प्राचार्य
काकासाहेब चव्हाण महाविद्यालय,तळमावले
सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी